# महाराष्ट्र शासन
## वित्त विभाग
## संचालनालय, लेखा व कोषागारे
## नवीन शासकीय कुटीर क्र. १५ व १६, प्लॉट क्रमांक १७६,
## फ्रि प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१.

दूरध्वनी क्रमांक : ०२२-२२०२५२४३ website: www.mahakosh.maharashtra.gov.in

---

बाह्ययंत्रणेमार्फत मनुष्यबळ (वाहन चालक) पुरविणाऱ्या संस्थाकडून ई-निविदा मागविणेबाबत.

संचालनालय लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई, सहसंचालक, लेखा व कोषागारे, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई व अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई यांच्या कार्यालयीन वाहनांकरिता चार वाहनचालक भरण्यासाठी, बाह्ययंत्रणेमार्फत वाहन चालक पुरविणाऱ्या नोंदणीकृत संस्थांकडून ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

बाह्ययंत्रणेद्वारे मनुष्यबळ पुरविणाऱ्या संस्थाकरिता,ई-निविदा सादर करणेसाठी सविस्तर तपशिल, आवश्यक अटी, शर्ती इ. विषयक तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

**अ. बाह्ययंत्रणेमार्फत मनुष्यबळ (वाहनचालक) पुरविणाऱ्या संस्थांसाठी अटी व शर्ती**

१. संबंधित संस्था/अर्जदार ही खालीलपैकी एका कायद्यांतर्गत नोंदणीकृत असावी. (नोंदणी प्रमाणपत्राची प्रत सोबत जोडावी.)
   - मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम,
   - भागीदारी संस्था अधिनियम,
   - सहकारी संस्था अधिनियम
   - कंपनी अधिनियम

२. ई-निविदा अर्जासोबत अनामत रक्कम रु.२०,०००/- ऑनलाईन स्वरुपात भरणे आवश्यक आहे.

३. दरमहा अदा होणाऱ्या देयकामधून नियमानुसार आयकर वजा करण्यात येईल.यासाठी पॅनकार्डची छायांकित प्रत ई- निविदा अर्जासोबत UPLOAD (अपलोड) करणे आवश्यक आहे.

४. बाह्ययंत्रणेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या वाहनचालकांना मासिक पारिश्रमिक त्यांच्या बँक खात्यामध्ये अदा केल्याचा पुरावा संबंधित संस्थेस या संचालनालयास प्रत्येक महिन्यात सादर करावा लागेल, त्यानंतरच पुढील महिन्याचे वेतन संस्थेस अदा करण्यात येईल. तसेच वाहनचालकांच्या वेतनातून EPF अंतर्गत वर्गणी वजा करण्यात येत असल्याचे प्रमाणपत्र UPLOAD (अपलोड) करणे आवश्यक राहील.

५. मागील ३ वर्षाच्या कालावधीत किमान २ शासकीय /निमशासकीय कार्यालयांना वाहनचालक कंत्राटी तत्वावर पुरविल्याबाबत व त्यांचे काम समाधानकारक असल्याचे संबंधित कार्यालयाचे प्रमाणपत्र UPLOAD (अपलोड) करावे लागेल.

६. दरमहाचे एकूण देयकाचे प्रदानातून ५ % अनामत रक्कम राखून ठेवण्यात येईल, व कराराचा कालावधी संपुष्टात आल्यावर सदर रक्कम परत करण्यात येईल.

७. वाहनचालक उमेदवाराची सेवा चालू ठेवण्याचे /संपुष्टात आणण्याचे सर्व अधिकार संचालक, लेखा व कोषागारे, मुख्यालय, मुंबई यांचे स्वाधीन राहतील

८. वाहनचालकाच्या निष्काळजीपणामुळे वाहनाचे काही नुकसान झाल्यास संस्थेस त्याच्या दुरुस्तीचा खर्च करावा लागेल. तसेच दुर्देवाने वाहनचालकास गंभीर स्वरुपात इजा झाल्यास त्याच्या वैद्यकीय

खर्चाचे अथवा नुकसानभरपाईचे कोणतेही उत्तर दायित्व हे या संचालनालयाकडे राहणार नाही. त्याची पूर्णत: जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.

९. संस्थेची वार्षिक उलाढाल ही मागील तीन वर्षांसाठी सरासरी दहा लाखापेक्षा कमी नसावी. तसेच सनदी लेखापालांकडून प्रमाणित करण्यात आलेल्या मागील दोन वर्षांच्या ताळेबंदाच्या प्रती निवदा अर्जासोबत UPLOAD (अपलोड) करण्यात याव्यात.

१०. वाहनचालक वेळेवर कार्यालयात उपस्थित न झाल्यास किंवा विनापरवानगी गैरहजर राहिल्यास त्याचे त्या दिवसाचे वेतन अदा करण्यात येणार नाही.

११. वाहनचालक रजेवर असल्यास पर्यायी वाहनचालक पुरविणे बंधनकारक राहील.

१२. वाहन चालक उमेदवारास भौगोलिक (मुंबई शहर/उपनगर, व बाहेरील जवळपासच्या जिल्हयांचे) ज्ञान असणे आवश्यक.

१३. उमेदवाराच्या सचोटी/ चारित्र्याबाबतचे पोलीस खात्याचे प्रमाणपत्र हजर झाल्यावर सादर करावे लागेल.

१४. कायमस्वरुपी शासकीय नोकरीसाठी कार्यालयाकडे/ शासनाकडे /न्यायालयाकडे दावा अथवा खटला करणार नाही, अशा आशयाचे हमीपत्र सेवेत हजर होताना सादर करणे बंधनकारक.

१५. वाहनचालकाचा प्रत्येक दिवसाचा कामकाजाचा कालावधी आठ तास राहील. याव्यतिरिक्त पुढे काम झाल्यानंतर शासन निर्णय वित्त विभाग, दिनांक ९.९.२०११ अन्वये निर्धारित केलेल्या प्रचलित दराप्रमाणे अतिकालिक भत्ता लागू राहील. सध्या अतिकालिक भत्त्याचे दर पुढीलप्रमाणे आहेत. (अ). कामाच्या दिवशी /रविवार/सुट्टीच्या दिवशी ९ तासांपेक्षा (भोजन समय धरुन) जास्त काम झाल्यास त्यापुढे प्रति तास रु.४०/-भत्त्याचा दर असून, अर्धा तास व त्यापुढील कामासाठी तो पूर्ण तास गणण्यात येईल. (ब) तसेच वाहनचालकास एका महिन्यात मिळणाऱ्या अतिकालिक भत्त्याची एकूण रक्कम त्याच्या पगाराच्या ५० % पेक्षा जास्त असणार नाही.

१६. रोजगार व स्वयंरोजगार विभाग, शासन निर्णय क्र.रोस्वरो२००२/प्र.क्र.२६७/रोस्वरो-१, दिनांक १७.८.२००२ मधील अ.क्र.८ अन्वये शासकीय कार्यालयामध्ये किंवा निमशासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यालयामध्ये सेवेचा पुरवठाकरिता निविदा भरताना अनामत रक्कम भरण्याच्या अटीतून पंजीकृत बेरोजगारांच्या सहकारी सेवा संस्थाना / लोकसेवा केंद्राना सूट देण्यात येत आहे.

१७. कोणतीही ई-निविदा स्विकारण्याचा किंवा एखादी अथवा सर्वच ई-निविदा कारण न देता नाकारण्याचा हक्क संचालनालयास राहील.

## ब. <u>वाहनचालक उमेदवारांसाठी अटी व शर्ती.</u>

१. प्रादेशिक परिवहन अधिकारी, यांनी संबंधित उमेदवारास जारी केलेले एच.एम.व्ही. /एल.एम. व्ही. वाहन चालविण्याची मूळ अनुज्ञप्तीपत्र /परवाना (Driving License)

२. उमेदवार वाहन चालविण्यासाठी मानसिक /शारीरीक दृष्टया पात्र असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र.

३. उमेदवारास L.M.V.वाहन चालविण्याचा किमान ३ वर्षांचा अनुभव असल्याचे संस्थेचे प्रमाणपत्र. (खाजगी व्यक्तिंकडे काम केल्याचे प्रमाणपत्र चालणार नाही.)

४. उमेदवार किमान १० वी उत्तीर्ण असावा.

५. दिनांक १.११.२०१६ रोजी उमेदवाराचे वय हे ५० वर्षापेक्षा जास्त नसावे.

६. उमेदवारास मराठी व हिंदी भाषा अवगत असावी.

७. उमेदवार निर्व्यसनी असावा

८. उमेदवारास वाहन दुरुस्तीची प्राथमिक माहिती असावी.

वर नमूद अटी व शर्तींची [(अ) व (ब)] पूर्तता करणाऱ्या संस्थाकडून ई-निविदा मागविण्यात येत आहेत. ई-निविदा अर्जाचे मूल्य रु.२००/-(रु.दोनशे फक्त) असून, ई-निविदा अर्ज दिनांक ०५/१२/२०१६ ते दिनांक २४/१२/२०१६ या कालावधीत https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील. ई-निविदा सादर केल्यानंतर पुढील कार्यवाहीच्या अनुषंगाने आवश्यक माहितीसाठी संकेतस्थळावरील STATUS पाहण्याची जबाबदारी निविदाकाराची राहील.

**ठिकाण : मुंबई.**
**दिनांक : ०२/१२/२०१६.**

संचालक,
संचालनालय,लेखा व कोषागारे,
महाराष्ट्र राज्य, मुंबई. २१